# सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था,
# महाराष्ट्र राज्य पुणे यांचे कार्यालय,नवीन मध्यवर्ती इमारत,पुणे-४११ ००१

**दूरध्वनी क्र.०२०-२६१२२८४६/४७** **ई-मेल आयडी-** cooperationtransfer21@gmail.com

**अत्यंत महत्त्वाचे/कालमर्यादा**

जा.क्र.आस्था/कक्ष-२/समुपदेशन/बदली धोरण-२१/गट-ब/पसंतीक्रम/२१ दिनांक :- मार्च,२०२१
31 MAR 2021

प्रति,

विभागीय सहनिबंधक,
सहकारी संस्था (प्रशासन/ लेखापरिक्षण)(सर्व)

**विषय :- समुपदेशनाव्दारे सर्वसाधारण बदल्या — सन २०२१**
**सहाय्यक निबंधक सहकारी संस्था गट-ब व विशेष लेखापरिक्षक सहकारी संस्था वर्ग-२ सवंर्गातील बदलीपात्र अधिकाऱ्यांकडून समुपदेशन बदली धोरणानूसार पसंतीक्रम मागविण्याबाबत..**

संदर्भ :- या कार्यालयाकडील पत्र जा.क्र.आस्था/कक्ष-२/समुपदेशन/बदली धोरण-२१/गट-ब/२१ दि.३१/०३/२०२१

उपरोक्त विषयाचे संदर्भीय पत्राकडे आपले लक्ष वेधण्यात येत आहे.

समुपदेशन बदली धोरणाप्रमाणे माहे मार्च अखेर प्रसिध्द करावयाच्या यादया, आपल्या विभागातील सहाय्यक निबंधक सहकारी संस्था गट-ब व विशेष लेखापरिक्षक सहकारी संस्था वर्ग-२ सवंर्गातील बदलीपात्र अधिकाऱ्यांना पोहचविण्याकरिता संदर्भीय पत्राने आपणास कळविण्यात आले होते.

आता आपल्या विभागातील सहाय्यक निबंधक सहकारी संस्था गट-ब व विशेष लेखापरिक्षक सहकारी संस्था वर्ग-२ सवंर्गातील बदलीपात्र अधिकाऱ्यांना शासन निर्णय दि.०९/०४/२०१८ परिशिष्ट क्र.१ सोबतचे विवरणपत्र क्र.१ मधील विहीत नमुन्यातील पसंतीक्रम cooperationtransfer21@gmail.com या ई-मेल पत्त्यावर दि.१५ एप्रिल २०२१ पूर्वी सादर करण्याबाबत आपलेस्तरावरुन सुचित करावे. तसेच बदलीपात्र अधिकाऱ्यांकडून विहीत विवरणपत्रातील पसंतीक्रम मुदतीत या कार्यालयास सादर होतील असे पहावे.

(अनिल कवडे)
सहकार आयुक्त व निबंधक
सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रत माहिती व पुढील तात्काळ कार्यवाहीसाठी -

१. मा. साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे (सस्नेह)
२. मा. आयुक्त वस्त्रोद्योग, वस्त्रोद्योग आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, नागपुर (सस्नेह)
३. मा. आयुक्त, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, पुणे (सस्नेह)
४. मा. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकारी अपिल न्यायालय मुंबई
५. पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे
६. सचिव, झोपडपटटी पुनर्वसन प्राधिकरण, प्रशासकीय इमारत प्रो.अनंत काणेकर मार्ग,वांद्रे (पूर्व)मुंबई
७. कार्यकारी संचालक, दि. महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग फायनान्स कॉर्पोरेशन लि. मुंबई
८. विशेष कार्य अधिकारी (लेखापरीक्षा मंडळ) (पदुम) महाराष्ट्र राज्य, मुंबई

९. सहनिबंधक, सहकारी संस्था (दुग्ध)महाराष्ट्र राज्य मुंबई
१०. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)
११. जिल्हा विशेष लेखापरीक्षक सहकारी संस्था (सर्व)
१२. कार्यासन अधिकारी, माहिती व तंत्रज्ञान कार्यासन, मुख्यालय, पुणे

यांना कळविण्यात येते की, सदरचे पत्र सहकार आयुक्त कार्यालयाच्या संकेतस्थळावर दि.०१/०४/२०२१ रोजी प्रसिध्द करण्यात यावे.

प्रत माहितीस्तव सविनय सादर -

मा.अपर मुख्य सचिव (सहकार), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय मुंबई